दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १८७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.७ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## श्री धाविर महाराजांचा पालखी सोहळा



## रायगड पोलिसांनी दिली सशस्त्र मानवंदना

**दै.रायगड नगरी । रोहा**

**जिल्ह्याचे श्रध्दास्थान आणि रोहयाचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज यांच्या पालखी सोहळ्यास गुरूवारी पहाटे मोठया उत्साहात सुरूवात झाली. यावेळी रायगड पोलिसांच्या वतीने पोलिस निरीक्षक प्रमोद बाबर व पथकाने श्री धाविर महाराजांना सशस्त्र मानवंदना दिली. हा सलामी सोहळा पाहण्यासाठी मंदिरात प्रचंड गर्दी झाली होती, यावेळी खासदार, आमदार आदी मान्यवर उपस्थित होते.**








सलामीसोहळा पाहण्यासाठी भल्या पहाटेपासून मंदिर परिसरात भाविकांनी गर्दी केली होती, यावेळी माजी खा. सुनिल तटकरे, माजी पालकमंत्री अदिती तटकरे, आम. अनिकेत तटकरे, तहसिलदार कविता जाधव, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश कोळी, कार्यवाह भुषण भादेकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, सरचिटणीस विजयराव मोरे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकार, शिवसेना तालुकाप्रमुख समीर शेडगे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोड़े, लालताप्रसाद कुशवाह, विश्वस्त नितिन परब, समिर सकपाळ, आनंद कुलकर्णी, महेश सरदार, संदीप सरफळे, आप्पा देशमुख, हेमंत कांबळे, सुशिल शिंदे, अमित उकडे, राजेश काफरे, शैलेश रावकर, रविंद्र चाळके आदींसह ट्रस्ट आणि उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पून्हा महाराजांना पोलिस मनवंदना देण्यात येते, पालखीच्या स्वागतासाठी शहरात ठीकठीकाणी फुलांनी आणी सढारांगोळयांनी बहरलेले रस्ते आणी विशेष करून रात्रीच्या वेळी करण्यात येत असलेली रोषणाई या सोहळयाला एक वेगळे रूप प्राप्त करून देते, रोहयात पालखीच्या दर्शना साठी येणाऱ्या भाविकांसाठी शहरात ठिकठिकाणी विविध सामाजिक मंडळांमार्फत थंड पेये आणि अल्पपोहाराची व्यवस्था केली जाते.

**या उत्सवानिमित्त मंदिराचा संपुण परिसर विविध रंगी फुलांच्या सजावटीने सजविण्यात आले होते, पाण्याचे उंच कारंजे आणि सुंदर रांगोळयांनी वातावरण प्रसन्न झाले होते. भल्या पहाटे मंगलमय वातावरणात गोंधळ्यांच्या वाद्याने ग्रामदैवताची महाआरती संपन्न झाली. पोलिसांनी मानवंदना दिल्यानंतर महाराजांची पालखी पारंपारिक वाद्यांच्या गजरात मार्गस्त झाली. शहरातील ठरलेल्या मार्गावर विविध ठिकाणी ग्रामस्तांना दर्शन देत पालखी दुसऱ्या दिवशी सकाळी मंदीरात परतते.**

## विजयादशमी निमित्त संघाचे पनवेलमध्ये दिमाखदार संचलन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

विजयादशमी निमित्त सीमोल्लंघन करण्याची हिंदु धर्मात परंपरा आहे. ह्या परंपरेला अनुसरून दरवर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघा तर्फे पथसंचलन केले जाते. त्या अनुषंगाने पनवेलमध्ये संघाचे दिमाखदार संचलन झाले.

१९२५ साली दसऱ्याच्याच दिवशी संघाची स्थापना झाली होती, त्यामुळे संघामध्ये दसऱ्याच्या पथसंचलनाला विशेष महत्त्व असते. गेली दोन वर्षे कोरोना निर्बंधामुळे पथसंचलन झाले नाही, त्यामुळे यावर्षी संघ स्वयंसेवकांमध्ये वेगळाच उत्साह होता, अतिशय शिस्तबद्ध व दिमाखदार असे संचलन पनवेलकरांना अनुभवायला मिळाले. हे संचलन रचना व प्रार्थना करून शहर पोलिस स्टेशन पासून सुरू झाले. घोष (बँड) पथक, ध्वज दंडासह करंजाडे पासून ठाणानाका एवढ्या भागातील गणवेशातील शंभरहुन अधिक स्वयंसेवकांचे हे संचलन एचओसी कॉलनी, कफ नगर, सावरकर पुतळा अशा मार्गाने झाले. मार्गक्रमण करताना ठिकठिकाणी ध्वजासह स्वयंसेवकांवर नागिरकांनी पुष्पवृष्टी केली. संचलनाची सांगता शहरातील चिंतामणी हॉल येथे झाली. हॉलमध्ये शस्त्रपूजन, प्रात्यक्षिके व्याख्यान असा कार्यक्रम झाला. यावेळी स्वयंसेवकांकडून शाखाशहा आकर्षक प्रात्यक्षिके सादर केली गेली. उत्स- वाला वक्ते म्हणून संघाच्या कोकण प्रांताच्या महाविद्यालयीन विभागाचे प्रमुख सुहास पोतदार उपस्थित होते, त्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त पोलिस अधिकारी तथा आर्ट ऑफ लिव्हिंगचे योग शिक्षक हनुमंतराव शिंदे हे उपस्थित होते.

### संजय गांधी निराधार योजनेसाठी ६२५ कोटी, श्रावणबाळसेवा राज्य निवृत्तीवेतनसाठी

## १ हजार १९४ कोटी रुपयांचा निधी सर्व जिल्ह्यांना वितरण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत ६२५ कोटी रुपये तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत १ हजार १९४ कोटी रुपये निधी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वितरीत करण्यात आला आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजनेतर्गत किमान १८ ते ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वतःचा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु, पोटगी न मिळालेल्या अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहित स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना लाभ मिळतो.

या योजनेमध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१ हजार पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. या योजनेखाली पात्र लाभार्थींना रुपये १ हजार दरमहा इतके अर्थसहाय्य दिले जाते. तसेच श्रवणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून दारिद्र्य रेषेखालील यादीच्या कुटूंबात नांव असलेल्या व रु.२१,०००/-

.../२

## पनवेलमध्ये तब्बल २५ फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे दहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दृष्टप्रवृत्ती, वाईट विचारांवर विजय म्हणून विजयादशमी म्हणजेच दसर्यानिमित्त पनवेल शहरातील मिडलक्लास सोसायटी येथील मैदानात रावणाच्या प्रतिकृतीचे दहन करण्यात आले. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच पनवेलमध्ये रावण दहनाचा कार्यक्रम झाला.

मिडलक्लास सोसायटी मैदानातील झंकार नवरात्रोत्सवात दसर्यानिमित्त खास रामचरित्रावर आधारित रामलिलेचे नाट्यमय सादरीकरण करण्यात आले. बुधवारी रात्री हिंदू संस्कृतीनुसार तब्बल २५ फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे दहन करण्यात आले. रावण वध म्हणजेच सत्याचा असत्यावर विजय, अज्ञानावर ज्ञानाचा विजय असल्याचे प्रतिक मानले जाते. आज आपण रावण दहना सोबत आपल्यातील क्रोध, मोह, लोभ, वासना, गर्व, मत्सर, द्वेष, निराशा, आळस, अज्ञान या सर्व गोष्टींचे दहन करून विजयादशमी साजरी करीत असल्याची प्रतिक्रिया आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, मिडलक्लास सोसायटीचे अध्यक्ष राजू गुप्ते, मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमीत झुंजारराव आदी उपस्थित होते. मिडलक्लास सोसायटी मैदानात या वर्षी साकारलेली रावणाची प्रतिमा २५ फूट असून यामध्ये बांबूच्या काठ्या, पुठ्ठा, कागदाचा वापर करण्यात आला होता, तसेच रावणाची प्रतिकृती बनविण्यासाठी खास दिल्ली येथून दरवर्षी मुंबई येथे तीन महिने अगोदर कारागिर येऊन काम करतात.

.../२



## हायकल लि. तळोजा मधील कामगारांना १६,२०० रुपये पगारवाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामगार नेते महेंद्र घरत यांच्या न्यू मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेच्या पाठपुराव्याने तसेच सहाय्यक कामगार आयुक्त समीर चव्हाण यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे बऱ्याच महिन्यांपासून प्रलंबित असणारा मे. हायकल ली. तळोजा या कंपनीतील कामगारांच्या पगारवाढीचा करार कामगार उपायुक्त कार्यालय खांदा कॉलनी येथे करण्यात आला.



या पगारवाढीच्या करारानुसार कामगारांना १६,२००/- रुपयांची पग- ारवाढ तसेच पहिल्या वर्षी ३७,०००/- रुपये त्यानंतर ३९,०००/- रुपये व शेवटच्या वर्षी ४१,०००/- रुपये बोनस म्हणून मिळणार आहेत. सर्व कामगारांना थकबाकी पोटी चार लाखांपर्यंत रक्कम मिळणार आहे.

या करारनाम्याप्रसंगी संघटनेतर्फे कार्याध्यक्ष पी. के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, संघटक योगेश रसाळ तर व्यवस्थापनातर्फे एच. आर. हेड संचित, तळोजा प्लँट एच. आर. मॅनेजर विशाल पाटील, पालेकर तर कामगारप्रतीनिधी प्रमोद म्हात्रे, निलेश कदम, चंद्रशेखर भोईर, विनोद देसाई, काशिनाथ पाटील आदी उपस्थित होते.

## कांगारुच्या फलकामुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये संभ्रम

### एमएसआरडीसी प्रशासनाचे अजब काम

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

कोणत्याही रस्त्याच्या बाजूला लावण्यात आलेल्या फलकांवर साधारण तेथील धोके, सुरक्षितता व स्थानिक परिसराची माहिती आदी बाबी असतात. मात्र भार- ताताच उपलब्ध नसणाऱ्या प्राण्याचे फलक चक्क वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावर लावले आहेत. त्या वाहनचालक व प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.



या मार्गावरून जातांना वाहनचालक व प्रवाशांना येथे कांगारुचे चित्र असलेले फलक दिसले तर त्यांना नक्की कळत नाही की येथे नक्की कोणते प्राणी आहेत व खबरदारी घ्यावी. वास्तविक या मार्गावर माकडे, डुक्कर, भेकर आदि प्राणी सर्रास

.../२

## जासई, चिर्ले, धुतूम ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात विज चोरी

**दै.रायगड नगरी । उरण**


उरण महावितरण कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या जासई,चिर्ले, धुतूम ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात विज चोरीच्या घटनेत वाढ झाली आहे.जासई विभाग महावितरण कार्यालयाचे उप अभियंता विजयकुमार मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली विज चोरी संदर्भात नुकताच चिर्ले गावातील १० जणांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

उरण महावितरण कार्यालयाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांच्या सततच्या दुर्लक्षित पणामुळे उरण शहर,नवघर,जासई, चिरनेर आणि कोप्रोली या महावितरण कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात विज चोरीच्या घटनेत वाढ झाली आहे. त्यात विजेची चोरी करणाऱ्या विज ग्राहकांना महावितरण कार्यालयातील अधिकारी,तसेच कंत्राटी कामगार हेच पाठीशी घालत असल्याने सदर ग्राहक हे आप आपल्या घरातील,व्यवसायातील इलेक्ट्रॉनिक मिटर मध्ये मोठ्या प्रमाणात हेराफेरी करत आहेत.तसेच काही महाशय हे राजरोसपणे खुलेआम विद्युत वाहक तारांवर आकडे टाकून विज चोरी करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. जासई येथील महावितरण कार्यालयातील उप अभियंता विजयकुमार मिश्रा यांनी अशा चोरीच्या घटनेला लगाम घालण्यासाठी पुढाकार घेतला आहे. नुकताच चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील १० विज चोरांवर महावितरण कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी कारवाईचा बडगा उगारला असल्याची माहिती खुद्द उप अभियंता विजयकुमार मिश्रा यांनी दिली आहे. परंतु चिर्ले गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार महावितरणच्या मिटर मध्ये हेराफेरी व विद्युत वाहक तारांवर आकडे टाकून विज चोरी करणाऱ्या इतरांवर कारवाईचा बडगा महावितरण कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून न उगारता त्यांना का सोडण्यात आले आहे.असा सवाल ही गावकरी उपस्थित करत आहेत.

## मंत्रालयात सांबर, चितळ, भेकर, साळींदरचा मुक्त संचार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिंदे सरकार सत्तेत आल्यापासून मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी लोकांची प्रचंड गर्दी उसळत असते. मात्र, या गर्दीत गुरुवारपासून सांबर, चितळ, भेकर, साळींदर असे हिंसक वन्यजीव प्राणी मुक्त संचार करताना दिसून येत आहेत. वन्यजीव सप्ताह निमित्त शासनाने हे प्राणी मंत्रालय त्रिमूर्ती प्रांगणात आणले आहेत. विशेष म्हणजे भरगर्दीत या प्राण्यांकडून कोणालाही काहीही त्रास नसून त्यांच्या समवेत स्लेफी फोटो सुद्धा काढता येत आहे. कारण हे सर्व प्राणी जरी जिवंत भासत असले तरी त्याच्या या प्रतिकृती आहेत.



मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण हे सर्वानाच भुरळ घालत

.../२

# मोफतच्या मोहात

निवडणुकीचा प्रचार करताना तुम्ही जी भरघोस आश्वासने देता, ती कशी पुरी करणार आहात आणि त्यासाठी निधीची तरतूद कशी केली जाणार आहे, अशी विचारणा अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना केली आहे. आयोगाने तसे पत्र पक्षांना पाठविले आहे. मात्र, निवडणूक आयोगाने आपली आधीची भूमिका बदललेली दिसते. गेली काही वर्षे वाढत्या क्रमाने प्रचारात जी मोफतगिरी चालू आहे, तिच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यासाठी घटनापीठही नेमले आहे. न्यायालयाने या आधीही निवडणूक आयोगाला 'प्रचारात दिल्या जाणाऱ्या टोलेजंग आश्वासनांच्या बाबतीत तुमचे काय म्हणणे आहे?' अशी विचारणा केली होती. मात्र, तेव्हा निवडणूक आयोगाने या प्रश्नापासून स्वत:ला वेगळे करीत राजकीय पक्षांवरच या आश्वासनांच्या नैतिकतेची जबाबदारी टाकली होती. आता आयोगाची भूमिका वेगळी आहे. या नव्या भूमिकेचे स्वागत करायला हवे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर चमकू लागलेल्या 'आम आदमी पक्षा'च्या वर्तनावर इतर साऱ्याच पक्षांचा आक्षेप दिसतो. प्रचार करताना आम आदमी पक्षाचा मुख्य रोख मोफत वीज, मोफत पाणी, मोफत शिक्षण आणि मोफत आरोग्यसेवा यांची आश्वासने देण्यावर असतो. मतदारांना निवडणुकीच्या प्रचारात आश्वासने देण्याची प्रथा नवी नाही. महाराष्ट्रातील काही शहरांजवळ समुद्र नाही म्हणून; नाहीतर तेथे उभ्या राहणाऱ्या दिग्गज नेत्यांनी 'येथे बंदर बांधून देऊ' असे आश्वासन द्यायलाही कमी केले नसते, अशी गमतीदार टीका महाराष्ट्रात केली जायची. तिचा रोखही बेफाट आश्वासने देण्यावरच होता. मात्र, तेव्हाची आश्वासने आणि आजची आश्वासने यांच्यात एक मूलभूत फरक आहे. तेव्हाची बहुतेक आश्वासने ही 'सार्वजनिक' स्वरुपाची असत. म्हणजे, कारखाना आणू, कॉलेजे उघडू, धरणे बांधू किंवा रस्ते करू... वगैरे. या सार्वजनिक आश्वासनांची जागा आता 'तुमच्या कुटुंबाचे वीज बिल माफ होईल. तुमच्या मुलांना मोफत कम्प्युटर मिळेल. तुमच्या घरातल्या महिलांना कायमचा मोफत बसप्रवास करता येईल,' अशा स्वरुपाची असतात. व्यापक विकासाऐवजी कल्याणकारी राज्याचा अतिरेक करणारी ही आश्वासने आहेत का, हा यातला मूलभूत प्रश्न आहे. त्यामुळे, या आश्वासनांच्या घटनात्मकतेचा विचार सर्वोच्च न्यायालयाला करावा लागेल. निवडणूक आयोगाने आपली अलिप्तता झटकून पक्षांना पत्रे पाठविली, हेही चांगलेच झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जुलैच्या मध्यावर एका सभेत बोलताना आपल्या राजकीय विरोधकांवर टीकेची झोड उठवली होती. विरोधक 'रेवडी संस्कृती' आणत आहेत, असे मोदी तेव्हा म्हणाले होते. तेव्हा मोदींचा जास्त रोख स्वाभाविकच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या आम आदमी पक्षाकडे होता. ही टीका योग्य होती. मात्र, स्वत: मोदी यांनी सन २०१४ मध्ये प्रचार करताना आश्वासनांचा अक्षरश: पाऊस पाडला होता. तेव्हाची त्यांची इंधन किंवा स्वयंपाकाच्या गॅसच्या भावांवरची टीका आणि ते कमी करण्याचे आश्वासन त्यांना पाळता आलेले नाही, हे दिसतेच आहे. याला अनेक आंतरराष्ट्रीय तसेच इतरही कारणे असतील. मात्र, निवडणुकांचा प्रचार करताना अर्थकारणाला पुरती सोडचिठ्ठी देऊन मतदारांना भूल घालणे, हे सर्वच राजकीय पक्ष आणि नेत्यांनी कायमचे टाळायला हवे. सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोग यांच्यातील सामंजस्याने नवी व्यापक आचारसंहिता तयार झाली; तर राजकीय पक्षांना काही प्रमाणात वेसण घालता येईल. कोणत्याही राज्यातील निवडणुकीत केवळ तेच राज्य डोळ्यांसमोर ठेवून वाट्टेल ती आश्वासने देणे हे गंभीर राजकारण करू इच्छिणाऱ्या राजकीय पक्षांना मुळीच शोभणारे नाही. एखाद्या राज्यात अशी आश्वासने दिली तर त्याचा स्वाभाविक ताण इतर राज्यांमध्ये तयार होतो. ती एक लाटच निर्माण होऊ शकते. असे झाले तर देशाच्या अर्थकारणाचा सम्यक विचार कोण करणार? राजकीय पक्षांनी प्रचारात धोरणात्मक बोलावे, विकासाची वेगळी प्रारूपे मतदारांना सादर करावीत किंवा सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर टीकाही करावी. मात्र, अमुक वस्तू, सेवा किंवा सुविधा मोफतच देऊ, अशी आश्वासने विकासाच्या साऱ्या संकल्पनेलाच धक्का लावणाऱ्या आहेत. खरेतर, याच दृष्टीने आमदार तसेच खासदार यांना दिल्या जाणाऱ्या वाढत्या निधीकडेही सर्वोच्च न्यायालयाने एकदा पाहायला हवे. तो विषय काहीसा वेगळा असला तरी आश्वासने आणि लालूच यातली सीमारेषा सर्वोच्च न्यायालयाने या खटल्याच्या निमित्ताने एकदा स्पष्ट करावी. भारतीय मतदाराचे सर्वांना कौतुक असले तरी तात्कालिक लाभाचा मोह होणे, हा मानवी स्वभाव आहे. त्यामुळे, विकासाचे दीर्घकालीन स्वप्न रेखाटण्यापेक्षा मोफत सेवासुविधांचा मोह पटकन पडू शकतो. देशाची राजकीय संस्कृती आधीच अनेक प्रकारे घसरणीला लागली आहे. त्यात ही नवी भर नको. सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोग यांनी ही घसरण रोखावी.

# वरवठणे येथील अपघातात वणीतील दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत वरवठणे येथील एकाचा दुचाकी अपघातात मृत्यू झाल्याची घटना ताजी असतांनाच नागोठणे रोहा रस्त्यावर वरवठणे गावाच्या हद्दीत झालेल्या दुसऱ्या एका अपघातात नागोठण्याजवळील वणी येथील दुचाकी चालक मयूर महादेव राऊत (वय २४) हा गंभीर जखमी झाल्याने त्याचा या अपघातात जागीच मृत्यू झाला. हा अपघात गुरूवारी (दि.६) पहाटेच्या सुमारास घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

टीव्हीएस कंपनीची अपाचे मोटारसायकल वेलशेत बाजूकडून वरवठणे चारफाटा बाजूकडे घेऊन जात असलेला मयूर वरवठणे गावाच्या हद्दितील आदिवासी वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पुढे आल्यानंतर त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले.

नंतर मोटारसायकल रस्त्याच्या चुकीच्या बाजूला जाऊन रस्त्याच्या बाजूलाच असलेल्या पाण्याच्या मोठ्या पोलादी जलवाहिनीवर जोरात जाऊन धडकली. या अपघातात मयूरच्या डोक्याला गंभीर जखमा झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तरुण मुलाच्या अपघाती मृत्यूने वणी गावातील राऊत कुटुंबावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या अपघाताची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात करण्यात आली असून याप्रकरणी नागोठण्याचे पोलिस निरिक्षक राजन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक सचिन निकम हे अधिक तपास करीत आहेत.

# हृदयात राम आणि हाताला काम देणार आमचं हिंदुत्व : शिरिष घरत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्ष प्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व तत्कालीन महाविकास आघाडी सरकार यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजने अंतर्गत फिरते विक्री केंद्र योजनेतून बेरोजगारांना स्वंयरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने माझा व्यवसाय माझा हक्क अशी योजना राबविण्यात आली होती. या योजने अंतर्गत आज शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या माध्यमातून खारघर येथील योजनेच्या लाभार्थी सौ. वैशाली सावंत यांच्या नावे नवीन खारघर येथील शिल्पचौक येथे स्नॅक्स कॉर्नर चा व्यवसाय सुरू करण्यात आला. या गाडीचे उदघाटन शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेना महानगर समन्वयक दिपक घरत, खारघर शहर प्रमुख गुरुनाथ पाटील, कळंबोली शहर समन्वयक गिरीश धुमाळ, विभाग प्रमुख अनिल तळवणेकर, महिला आघाडीच्या विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, तालुका संघटिका सौ. सुजाता कदम, उपतालुका संघटिका सौ. टिया धुमाळ, विभाग संघटिका सौ. वैशाली सावंत, खारघर शहर संघटिका सौ. रूपाली कवळे, उपशहर संघटिका सौ. संपदा धोंगडे, शाखा संघटिका सौ. हुसनारा खान, सौ. रेखा शर्मा आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामगार नेते दिवंगत शाम म्हात्रे यांच्या जंयती निमित्त पनवेलमध्ये स्वर संगीत शाम कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ज्येष्ठ कामगार नेते स्वर्गीय शाम म्हात्रे यांच्या जयंती निमित एकता कॅटलीस्ट, कोकण श्रमिक संघ आणि आगरी शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ७ ऑक्टोबर २०२२ रोजी आदय क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत 'स्वर संगीत शाम' या संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर आयोजित कार्यक्रमात कामगार नेते दिवंगत शाम म्हात्रे यांना अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी, कामगार वर्ग, प्रकल्पग्रस्त, शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कामगार नेत्या श्रुती शाम म्हात्रे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९७६९५१८३९९ या क्रमांकावर संपर्क साधावे.

# दिडफुटाच्या नगिणीला जिवदान

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड शहरातील पप्पु भगत यांच्या इमारतीच्या आवारात दिडफुटाच्या नगिणीला सर्पमित्र संदीप घरत यांनी दिले जिवदान दिले.

मुरूड शहरातील भोगेश्वर पाखाडी येथिल पप्पु भगत यांच्या इमारतीच्या आवारात सकाळी दिड फुटाच्या नागिणीने दर्शन दिले. त्यावेळी पप्पु भगत यांनी सर्प मित्र संदीप घरत यांना संपर्क करून बोलावून घेतले. सर्पमित्राने तात्काळ घटनास्थळी धाव घेत या नागिणीला शिताफीने पकडून वनखात्याच्या ताब्यात दिले. याच परिसरात काही दिवसांपुर्वी आंबुर्ले इमारती मध्ये दिड फुटाच्या नागाला पकडले होते. त्यामुळे ही दुसरी घटना आहे. या परिसरात नागिणीची आणखी पिल्ले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### जाहीर ई-निविदा सुचना

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/२५२१/प्र.क्र.१८/२६४२/२०२२ दि.०६/१०/२०२२

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडके इत्यादी शासकीय / निम शासकीय (Centeral Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून Request for Proposal (RFP) मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/100/2022-23 | पनवेल महानगरपालिका शहरातील वडाळे तलाव एल.ई.डी. प्रकाश योजना व रोषणाई (Illumination) करून सौंदर्यीकरण करणेबाबत. | ५,२१,९९,२१८/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०७/१०/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ.प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका


# तिनविरा येथे वनरक्षकांसाठी साप आणि अन्य वन्यजीव बचावकार्य कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग आणि ऑर्गनायझेशन फॉर वाईल्ड लाईफ स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमानाने वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून अलिबाग वनविभागाच्या वनरक्षकांसाठी साप आणि अन्य वन्यजीवांचे बचावकार्य कसे करावे, याबाबतची कार्यशाळा तिनविरा येथील वनविभागाच्या केंद्रामध्ये डॉ.प्रसाद दाभोळकर यांच्याद्वारे घेण्यात आली.

वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग आणि ऑर्गनायझेशन फॉर वाईल्ड लाईफ स्टडीज या संस्था गेली अनेक वर्षे वन्यजीव बचाव आणि जनजागृतीसाठी कार्यरत आहेत.

अलिबाग आणि भोवतालचा परिसर हा नैसर्गिक जैवविविधतेने नटलेला आहे, त्यामुळे साप आणि अन्य वन्यप्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर इथे आढळून येतो. अशा वेळी मनुष्य-वन्यप्राणी संघर्ष हा स्वाभाविक आहे, अशा प्रसंगी वनविभागाची भूमिका फार महत्वाची असते. म्हणूनच वनरक्षकांना बचावकार्याचे योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक असते, जेणेकरुन वन्यजीवांचे संरक्षण होईल तसेच सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती होईल, असे डॉ. प्रसाद दाभोळकर यांनी सांगितले. या कार्यशाळेसाठी अलिबाग वनविभाग, वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग चे अदिती सगर, ओमकार कामतेकर, पारस घरत, सुजित लाड, रुपेश गुरव, समीर पालकर आणि ऑर्गनायझेशन फॉर वाईल्ड लाईफ स्टडीज च्या सभासदांनी विशेष मेहनत घेतली.


## जाहीर सुचना

या सूचनेद्वारे तमाम जनतेस सूचित करण्यात येत आहे की श्रीमती स्वाती चंद्रगौडा पाटील वय वर्षे ५३ राहणार १०४ वरून नियती गार्डन, मोहम्मद वाडी, पुणे यांच्या ताब्यातील मूळ दस्तावेज क्रमांक १९५७ गहाळ झाले आहेत, मूळ दस्तावेज पनवेल शहर परिसरात गहाळ झाले आहेत. सदरची तक्रार १ ऑक्टोबर २०२२ रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आलेली असून तिचा तक्रार क्रमांक ०२२/२०२२ आहे. तरी सदरचे मूळ दस्तावेज कुणाला सापडल्यास त्यांनी उपरोक्त पत्त्यावर अथवा ९०२८७८९७९६ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

सही/-
**श्रीमती स्वाती चंद्रगौडा पाटील**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खांदा कॉलनी नवीन पनवेल (पश्चिम) येथील खलील वर्णन केलेल्या मिळकती या आमचे अशिल श्री.सुहास हळदकर व सौ. स्मिता हळदकर यांनी सदर मिळकतीचे मुळ मालकांकडून कायम स्वरुपात खुषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतवर कोणाचाही गहाण,दान, बक्षिस, लिज, मृत्यूपत्र, साठेकरार, ताबा, इजमेंट बोजा, तारण, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| सिडको टाईप | बिल्डींग नं. | फ्लॅट नं. | सेक्टर | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| पीएल ५ बी | ६ | १२ | १४ | श्री.अभय एस हनुमंते |

ठिकाण : पनवेल
दिनांक : ६/१०/२०२२

सही/-
**ॲड.कोमल सिंग**
पीएल ५ बी/१६, सेक्टर-१४,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल,
जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९७५७०१०७१६


# पृष्ठ क्र.१ वरुन...

## १ हजार १९४ कोटी रुपयांचा निधी सर्व जिल्ह्यांना वितरण

पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या ६५ व ६५ वर्षावरील पात्र लाभार्थीस दरमहा रु. १,०००/- अर्थसहाय्य देण्यात येते.

माहे सप्टेंबर २०२२ अखेरपर्यंत संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत रु.५९५ कोटी तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतंर्गत रु. १०५३ कोटी निधी खर्च झालेला आहे. या दोन्हीही योजनांमधून लाभार्थींना दरमहा नियमित अनुदान देता यावे, ही बाब विचारात घेऊन संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत रु.६२५ कोटी तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतंर्गत रु. १ हजार १९४ कोटी निधी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वितरीत करण्यात आला आहे, अशी माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

## पनवेलमध्ये तब्बल २५ फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे दहन

यंदा पनवेलमध्ये प्रथमच दिल्लीतील कारागिरांकडून दसर्यानिमित्त रावणाची प्रतिकृती बनवून घेतली होती. या वेळी रामलीला व रावण दहनाचा कार्यक्रम पाहण्यासाठी तसेच दसरा सण साजरा करण्यासाठी नागरिकांनी केली होती.

## कांगारुच्या फलकामुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये संभ्रम

येतात. त्यामुळे फलकावर या प्राण्यांचे चित्र असणे आवश्यक होते. मात्र तसे झालेले नसल्याने या मार्गावरून खरंच आफ्रिकेतील कांगारू येतील की काय असेच वाटते आहे.

जंगल भागातून वाहने जातांना येथे असणारे प्राणी कळावेत, तसेच रस्त्यावर येणाऱ्या वेगवेगळ्या प्राण्यांना वाहनांचा धक्का लागू अपघात होऊ नये. आणि ज्यामुळे प्राणी तसेच माणसांना कोणतीही इजा होऊ नये यासाठी वाहने सावकाश व खबरदारीने चालवावीत यासाठी हे माहिती फलक लावण्यात येतात. मात्र कांगारूंच्या फलकामुळे संभ्रम निर्माण होत आहे.

## मंत्रालयात सांबर, चितळ, भेकर, साळींदरचा मुक्त संचार

असते. येथील त्रिमूर्ती तसेच वेगवेगळ्या विभागाकडून भरवले जाणारे संबंधित विभागाचे स्टॉल हे मंत्रालयात येणाऱ्या

सर्वानाच आकर्षित करीत असतात. सुधीर मुनगंटीवार हे वनमंत्री असताना त्यांनी याच त्रिमूर्ती प्रांगणात ताडोबा मधील वाघांची प्रतिकृती असलेले वाघ आणले होते. आजही त्यातील एक वाघ येथे आहे. तो नेहमीच येथे येणाऱ्या लोकांना भुरळ घालत असतो.

आता याच वाघासोबत गुरुवारपासून सांबर, चितळ, भेकर, साळींदर, उदमांजर, पिसोरी असे हिंसक वन्यजीव प्राणी मुक्त संचार करताना दिसून येत आहेत. भर गर्दीत एक भले मोठे सांबर आणि चितळ पाहुन अनेकांना आनंद होत आहे. त्यामुळे आपली रखडलेली कामे जरी पूर्ण झाली नाहीत किंवा मंत्र्यांची भेट जरी झाली नाही तरी या वन्यजीव प्राण्यांना पाहून त्याचा काहीसा संताप कमी होत आहे. त्याच्या सोबत सेल्फी फोटो घेण्यात अनेक जण दिसून येत आहे. भर गर्दीत हे उठून दिसणारे प्राणी जरी हिंसक असले तरी ते त्या प्राणांची प्रतिकृती आहेत. त्यामुळे भर गर्दीत या वन प्राण्यांचा कोणाला काही त्रास नसल्याचे दिसून येत आहे.


मे.सोनवलकर सो यांचे कोर्टात
**ॲड.प्रशांत म. भोईर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.१०४०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/११/२०२२

१) श्रीमती.वत्सला अविनाश ठाकूर
रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी
(ग्रुप ग्रामपंचायत उलवे) — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कु.आदिती अविनाश ठाकूर वय : १६ वर्षे, अज्ञान हिचा जन्म दि.१९/०४/२००६ रोजी मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला असून तिचे जन्माची नोंद, ग्रामपंचायत उलवे कार्यालयात तसेच कोणत्याही सरकारी अथवा तत्सम नोंदणी साठीचे आवश्यक कार्यालयात उपलब्ध नसल्याने अर्जदार यांनी कु.आदिती अविनाश ठाकूर हिचे जन्माची उशिरा नोंद करून मिळणेकामी ग्रामपंचायत उलवे व संबंधित अधिकारी यांस आदेश देणेकरिता मे.न्यायालय पनवेल येथे अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जाचे अनुषंगाने कु.आदिती अविनाश ठाकूर हिचे जन्माचे तारखेबाबत व सदर अर्जाबाबत कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी आदेश पारित करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०६/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



**ॲड.प्रतिभा पाटील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात
चौ.अर्ज क्र.१३१९/२०२२
नि.नं.८
ने.ता.४/११/२०२२

श्री.सुरेश तुकाराम कांबळे व इतर २ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मयत निर्मला तुकाराम कांबळे यांचे निधन दि.१२/०३/२०२२ रोजी प्लॉट नं.४९७, सेक्टर-२४, वहाळ (पुष्पक नगर), नवी मुंबई येथे झाले असून व सदर मयत निर्मला तुकाराम कांबळे यांच्या खालील नमूद मालकीच्या मिळकती संदर्भात मयत निर्मला तुकाराम कांबळे यांचे वारस असल्याबाबत अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**प्लॉट नं. ४९७, सेक्टर-२४, वहाळ (पुष्पकनगर), नवी मुंबई**
**एकूण क्षेत्रफळ : १५० चौ.मी.**
**ज्याची किंमत एकूण रक्कम रु.१३,८१,५००/- एवढी आहे.**

त्याअर्थी सदर अर्जदार यास त्याचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटस आज दि.२१/०९/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कंपनीच्या खात्यातील ९ लाख ६० हजार रुपयांचा परस्पर अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कंपनीच्या खात्यातील ९ लाख ६० हजार रुपयांचा परस्पर अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कळंबोली पोलिसांनी दोघांविरोधात अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.

रायटर बिझनेस सर्व्हीसेस प्रा. लि. या कंपनीत एटीएम कस्टुडीयन म्हणून कामाला असलेले सागर पवार (३०) व सूरज पवार (२१) यांना उलवे येथील एटीएम मशीनमधून पैसे काढण्यासाठी पाठवले होते. उलवे व उरण कोर्ट नाका येथील एटीएम मशीनमधून काढलेली ही रक्कम कळंबोली येथील ऑफिसमध्ये जमा करण्याचे काम दिले होते.

त्यानुसार सागर व सूरज हे दोघेही त्यादिवशी सकाळी कंपनीच्या कॅश व्हॅनमधून दोन सुरक्षा रक्षकांसोबत गेले होते. त्यानंतर दुपारी काम संपवून त्यांनी अनलोडींग कॅशची एक बॅग तसेच एटीएम मशीनची उर्वरित लोडिंगची २ लाख रुपयांची रक्कम कळंबोली कार्यालयात जमा करून ते निघून गेले होते.

मात्र, कंपनीतील वॉल्ट कॅश ऑफिसर यांनी रात्री जमा केलेली रक्कम मोजली असता उलवे येथील एटीएम मशीनमधून काढलेली ९ लाख ६० हजारांची रोख रक्कम त्यात नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे कंपनीतील कॅश ऑफिसरने सागर आणि सूरज यांच्याशी संपर्क साधून याबाबत विचारणा केली असता दोघांनी पैसे ऑफिमध्ये जमा केल्याचे सांगितले.

या प्रकारानंतर कंपनीकडून एटीएमच्या सीसी टीव्ही फुटेजची तपासणी केली असता उलवे येथील एटीएममधून काढलेल्या ९ लाख ६० हजार रुपयांच्या रकमेची बॅग निदर्शनास येत आहे.

मात्र, उरणमधील दिघोडे येथील एटीएममध्ये पैसे भरणा करताना ९ लाख ६० हजारांची कॅश दिसत नसल्याने दोघांविरोधात कळंबोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# माथेरान नागरी पतसंस्थेची निवडणूक होणार चुरशीची ; संस्थेसाठी वेळ देणारे संचालक हवेत सभासदांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नागरी पतसंस्थेची निवडणूक दोनदा तहकूब झाल्यानंतर शुक्रवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी होत आहे राष्ट्रवादी, शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने शिवराष्ट्र पॅनल तर काँग्रेस, भाजप व शिवसेना (शिंदे गटा तर्फे) पिसरनाथ पॅनल रिंगणात आहे. शिवराष्ट्र पॅनल कडून अनुभवी अजय सावंत, विवेक चौधरी, उमेदवार आहेत तर पिसरनाथ पॅनल कडून सुनिल शिंदे, सलीम मुजावर, संदीप शिंदे , प्रतिभा घावरे हे विरोधात आहेत अंजली येरफुल्लले यांनी बँकेत अनेक वर्ष सेवा केली असल्याने त्यांचा फायदा पतसंस्थेला निश्चितच होऊ शकतो.तर चंद्रकांत काळे व व चंद्रकांत सुतार हे पत्रकार देखील यावेळी निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत त्यामुळे ही निवडणूक चुरशीची ठरणार असल्याने संपूर्ण गावाचे लक्ष या महत्वपूर्ण सहकार क्षेत्राच्या निवडणुकीकडे लागले आहे. पुढील महिन्यात नगरपालिकेच्या निवडणुकादेखील पार पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे पतसंस्थेची ही निवडणुक जिंकण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी आपली ताकद पणाला लावलेली आहे.

माथेरान नागरी पतसंस्थाही एकमेव पतसंस्था




गावात असल्याने ती आणखी सक्षम पणे आर्थिकदृष्ट्या उत्तमपणे सुरू राहावी अशी सर्वच सभासदांची प्रमुख मागणी आहे.संस्थेचे सभासद कुशल बिरामणे हे या निवडणुकीसाठी खास गोव्याहून मतदानासाठी येत आहेत.त्यांचे देखील हेच म्हणणे आहे की पतसंस्थेच्या निवडणुकीच्या मतदानाच्या वेळी ज्या उमेदवारांना सहकारा क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान आहे व जास्तीत जास्त वेळ आपल्या संस्थेसाठी देऊ शकतात अशाच उमेदवारांना सभासदांनी मतदान केले पाहिजे. पतसंस्थेच्या निवडणुकीकडे नगरपालिकेच्या निवडणुकीच्या दृष्टीने पाहू नये या दोन्ही भिन्न प्रकारच्या निवडणुका आहेत.यामध्ये मतदारांना मतदानाचा काही मोबदला दिला जात नाही.

पतसंस्थेच्या निवडणुका दोनदा तहकुब झाल्याने सदस्यांमध्ये पहिल्यासारखा जोश दिसून येत नाही.तर काही अश्वपालकांचे एक पत्र सध्या गावात मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर वायरल झाले आहे या निवडणुकीतील एकूण२६ पैकी २५ उमेदवार हे गावात येणाऱ्या ई रिक्षाचे समर्थन करीत असल्याने पतसंस्थेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे त्यांनी आवाहन केले आहे. अश्वपालक देखील मोठ्या प्रमाणात पतसंस्थेचे सदस्य आहेत. ई रिक्षा सध्या गावातील ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे अश्वपालकांनी ई रिक्षा विरोधात दोनदा मोर्चा काढला होता तरी रिक्षाच्या समर्थनार्थ संपूर्ण गाव रस्त्यावर उतरले होते त्यांनी देखील समर्थनार्थ भव्य असा मोर्चा काढला होता त्यामुळे अश्वपाल काय निर्णय घेतात याकडे सुध्दा सर्वांचे काहीअंशी लक्ष लागले आहे. दोन्ही पॅनल नी सभासदांना आकर्षित करण्यासाठी पतसंस्थेत एटीएम सेवा सुरु करणे, वाहन कर्ज अशा विविध योजनाची आश्वासने दिली आहेत दहा वर्षानंतर पतसंस्थेच्या सभासदांना आपल्या पसंतीचा उमेदवार निवडण्याची यावेळी नामी संधी मिळाली आहे. या आधीच्या दोन्ही निवडणुका जागा वाटून घेण्यात आल्या होत्या.येथील मध्यवर्ती भागात असणाऱ्या शास्त्री हॉल( कम्युनिटी सेंटर येथे ) दि.७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतदानाची वेळ सकाळी ८ ते ४ वाजेपर्यंत असून मतमोजणी सुध्दा त्याचदिवशी सायंकाळी ५ वाजता सुरु होणार आहे.

# मेढेकरांची पाणी समस्या मिटणार ; जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर

**दै.रायगड नगरी । तळा**

मेढे गावाची पाणीटंचाई हटविण्यासाठी जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मेढे पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. यासाठी तब्बल ८४ लक्ष ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. याबाबतचे पत्र खा.सुनील तटकरे यांनी सुतारवाडी येथील कार्यालयात मेढे ग्रामस्थ यांना दिले.

यावेळी खा.सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस मागासवर्गीय रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड.उत्तम जाधव, तळा तालुका अध्यक्ष नाना भौड, कैलास पायगुडे, युवक अध्यक्ष नागेश लोखंडे, किशोर शिंदे, मंगेश भगत, जगदीश शिंदे, सुनील भौड प्रवीण अंबारले मेढे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापूर्वी अपेक्षित पाणीपुरवठा मेढे गावाला झाला नाही. त्यामुळे गावचा पाणीप्रश्न सुटला नाही. जलजीवन मिशन अंतर्गत मंजुर झालेल्या या योजनेमुळे मेढे येथील पाणी पुरवठा सुरळीत होईल असा विश्वास खा.सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.


माजी मंत्री आ.अदिती तटकरे यांच्या पाठपुरव्याने ही योजना मार्गी लागल्याचे ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले. या योजनेमुळे मेढे गावाचा पाणीप्रश्न कायमचा संपुष्टात येणार असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. या योजनेसाठी खा.सुनील तटकरे आ.अनिकेत तटकरे यांचेही सहकार्य लाभल्याचे सांगण्यात आले. गावाच्या विकासात पूर्वी आडकाठी घातली जात होती. आता संपूर्ण गावाने राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये जाहीर प्रवेश केल्याने विकासाची वाट सुकर झाल्याचे मेढे ग्रामस्थांनी सांगितले.



# पालीत पिसाळलेल्या बैलाची दहशत, तीन नागरिकांवर केला हल्ला

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीत एका पिसाळलेल्या बैलाने दहशत माजवली होती. त्याने तीन नागरिकांवर हल्ला देखील चढवला होता. शर्तीच्या प्रयत्नांनी बुधवारी (ता.५) सायंकाळी अखेर या बैलाला जेरबंद करण्यात यश आले.



बैलाला पकडण्यासाठी नगरपंचायत पाली, शिवऋण प्रतिष्ठान, रेस्क्यू टीम पुणे व शिवदुर्ग प्रतिष्ठान लोणावळा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संध्याकाळी पाच वाजता रेस्क्यू टीम पालीत दाखल झाली. बैलाला गुंगीचे औषध देऊ त्याला पकडण्यात आले आहे. अशी माहिती पाली नगरपंचायत स्वच्छता व आरोग्य सभापती विनायक जाधव यांनी दिली.

# रानडुकराची शिकार करून मांस विक्री करणाऱ्यांवर वनविभागाने केली यशस्वी कारवाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कर्जत वनपरिक्षेत्र अधिकारी यांना दि.४ ऑक्टोबर २०२२ रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वनपरिक्षेत्र कर्जत पूर्व परिमंडळ हुमगाव, मौजे साळोखवाडी येथील रहिवासी श्री.मारुती पवार यांच्या घरासमोर असलेल्या बकऱ्यांच्या बेड्यावर धाड टाकण्यात आली. यावेळी आरोपी दशरथ बाळू वाघमारे, शरद रघुनाथ वाघमारे, सोमनाथ पप्पू पवार, साळोखवाडी, दिपक लहानू पवार (सर्व आरोपी राहणार मौजे साळोखवाडी) यांनी रानडुकराची शिकार करून त्याच्या अवयवाचे व मांसाच्या विक्रीसाठी कोयत्याने तुकडे करीत असताना आढळून आले. त्यांनी वनकर्मचाऱ्यांना पाहून घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला.

मात्र वनकर्मचाऱ्यांनी या गुन्ह्यातील आरोपी क्र.१ दशरथ बाळू वाघमारे यांना ताब्यात घेतले. या आरोपीने सांगितलेल्या जबानीवरुन आरोपी क्रमांक ५ रविंद्र मुका वाघमारे, वय वर्ष ५२, रा.डोनेवाडी ता.कर्जत यास अटक करण्यात आले. तसेच वनकर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणावरुन रानडुकराचे ३९.१२० किलोग्राम मांस व अवयव हस्तगत केले तसेच ४ कोयते, तराजू काटा हे साहित्य जप्त केले. अटक करण्यात आलेले आरोपी क्र.१ दशरथ बाळू वाघमारे व आरोपी क्र.५ रविंद्र मुका वाघमारे यांची दि.५ ऑक्टोबर २०२२ रोजी चौकशी केली असता त्यांनी आरोपी क्र.२ शरद रघुनाथ वाघमारे, रा.साळोखवाडी व आरोपी क्र.४ दिपक लहानू पवार, रा.साळोखवाडी यांची माहिती दिल्याने या दोन्ही आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे या संपूर्ण कटात सहभागी असलेला आरोपी क्र.६ गजानन मारुती पवार, रा.डोणेवाडी ता.कर्जत यास दि.५ ऑक्टोबर २०२२ रोजी चौकशीकरिता ताब्यात घेवून आरोपी क्र.२, ४ व ६ यांना त्याच दिवशी सायंकाळी अटक केली.

दि.५ ऑक्टोबर २०२२ रोजी रोजी या गुन्ह्यातील आरोपींना प्रथम वर्ग न्यायालय, कर्जत येथे हजर करण्यात आले असून न्यायालयाने या प्रकरणी एकूण पाच आरोपींना ६ दिवसाची वनकोठडी देण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाचा कर्जत (पूर्व) वनक्षेत्रपाल श्री.प्रदीप चव्हाण हे अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे व पनवेल सहाय्यक वनसंरक्षक एस.एन.वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करीत आहेत. वनक्षेत्रात अवैधपणे कोणताही वनगुन्हा होत असल्याचे आढळून आल्यास १९२६ या टोल फ्री क्रमांकावर तात्काळ संपर्क साधून संबंधित माहिती देण्यात यावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

# सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे पहा, जगणं सुंदर होईल : प्रशांत देशमुख

**दै.रायगड नगरी । चौक**

जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पहा भूतकाळाविषयी विचार नं करता, भविष्याची चिंता नं करता, आपले जीवन आनंदात घालवावे,मग ज्येष्ठांचे जगणं सुंदर होईल असे प्रतिपादन शिवव्याख्याते, रायगड भूषण प्रशांत शांताराम देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे व्याख्यानावेळी केले.

प्रश्नांत देशमुख यांचे जगणं सुंदर आहे या विषयावरील व्याख्यानात बोलतेवेळी मला माझ्या गावी बोलताना मला खूप आनंद होत आहे आपल्या थोरामोठ्यांचे मिळालेले आशीर्वाद यामुळेच मला या क्षेत्रात भूमिका मांडणे शक्य झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान यशवंत सकपाळ यांनी भूषविले होते. सदर कार्यक्रमात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन १ ऑक्टोबर यादिवशी सदाशिव आपटेकर, सुनिता मानकामे या ज्येष्ठ सदस्यांचा विशेष सत्कार करण्यांत आला.तसेच कार्यक्रमास वसंत महाराज कुंभार, हरी महाराज माळी, नरेंद्र शहा, रामचंद्र देशमुख, शशिकांत साखरे आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव गजानन भोंडगे यांनी केले. सभागृहात आयोजित कार्यक्रमासाठी श्रोते सदस्यांनी चांगली हजेरी लावली होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश दळवी, मुरलीधर साखरे, सुरेश चौधरी, रघुनाथ बडेकर, राधाबाई बैलमारे यांचे सहकार्य लाभले तसेच श्री. दिनकर सूर्यराव यांनी अल्पोपहार दिला. आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक १) वारीबाई जयराम भगत, २) ज्ञानेश्वर जयराम भगत, ३) सदानंद जयराम भगत, ४) प्रमिला जयराम भगत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार ठरविला आहे. त्या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धसाखोशी, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | धसाखोशी | ६३/६/अ | ०.२२.२० पो.ख.०.००.८० | १.६२ |
| २ | धसाखोशी | ६३/६/ब | ०.२८.७० पो.ख.०.०१.३० | १.७० |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

उरण
सही/-
दिनांक : ७/९/२०२२ **ॲड.धिरज लहू डाकी**
**रा.बोरखार, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८१०८५४९१८३**

**ॲड.प्रिती जगदीश भारती**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०८८/२०२२
नि.नं.७/ड

सज्जाद अहमद शेख
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : नोकी
रा.बी/२/२०२, हावरे ग्रीन पार्क,
प्लॉट नं.१५, सेक्टर २२, कामोठे, फेज ३,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात कै.अहमद इस्माईल शेख यांचा मृत्यूचा दिवस ठरवून मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कै.अहमद इस्माईल शेख यांचा मृत्यू दि.१७/०८/२०२१ रोजी बी/२/१०२, हावरे ग्रीन पार्क, प्लॉट नं.१५, सेक्टर २२, कामोठे, फेज ३, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. मृत्यूनंतर धार्मिक रितीरिवाजाप्रमाणे कामोठे येथील स्मशानभूमी मध्ये जळीत करण्यात आलेले आहे. सदरचे जळीत करताना अर्जदार व त्यांचे इतर नातेवाईक हजर होते. त्यानंतर धार्मिक विधीही करण्यात आलेली आहेत. मात्र अर्जदार व त्यांचे नातेवाईक यांच्या अज्ञानीपणामुळे मृत्यूची नोंद पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड प्रभाग समिती-क कामोठे विभाग यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. सबब अर्जदार सज्जाद अहमद शेख यांनी कै.अहमद इस्माईल शेख यांचा मुलगा या नात्याने सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. सदरचे मृत्यूचे प्रमाणपत्र अर्जदार यांना कामाकरिता आवश्यक आहे.

त्याअर्थी कै.अहमद इस्माईल शेख यांचा मृत्यू दि.१७/०८/२०२१ चा दाखला मिळण्यास कोणाची हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत आपल्या हरकती या न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून अर्जदारास मृत्यूचा दाखला मिळण्याचे आदेश देण्यात येतील. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.४ माहे १०/२०२२ आमच्या सहीने दिले.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

मा.सोनावणे सा़े
**ॲड.जितेंद्र कुमार पांडेय**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.१०१३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.९/११/२०२२

राजेश कुमार दिक्षित व इतर ३
वय : ५३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.बी-३/८, सेक्टर-०२, वाशी,
नवी मुंबई, ता.ठाणे, जि.ठाणे-४००७०३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की,

१) अर्जदाराची पत्नी कै.सरोज राजेश दिक्षित हे लोटस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, वाशी, ता.जि.ठाणे येथे दि.२९/०९/२०१८ रोजी मरण पावले. अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

२) मृत्यूसमयी कै.सरोज राजेश दिक्षित यांच्या नावे उलवे, नवी मुंबई व खारघर, नवी मुंबई, पनवेल महानगरपालिका हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत होती. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**१) बी-२०१, कॉलिटी एक्सटेन्सीया, प्लॉट नं.२४९ ए, सेक्टर-१७, उलवे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६. कारटेप क्षेत्र ५१२ चौ.फुट**
**२) शॉप नं.७ आणि ८ तळमजला, प्लॉट नं.सी/४, सेक्टर-१२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१० कारपेट क्षेत्र ३४७.९० चौ.फुट**

अर्जदार हे कै.सरोज राजेश दिक्षित यांचे वारस आहेत. वरील मिळकत ही कै.सरोज राजेश दिक्षित यांनी विकत घेतली होती ती अर्जदारास त्याच्या नावे करायची आहे. म्हणून सिडको/पनवेल महानगरपालिका ऑथरिटीने मे.कोर्टाकडून वारस दाखला मागितला आहे. यासाठी अर्जदाराने कोर्टात अर्ज दाखल केला आहे. ज्या कुणीही व्यक्तीला या बाबतीत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात १ महिन्याच्या आत हजर राहून किंवा वकीलामार्फत हरकत घ्यायची आहे. योग्य मुदतीत हरकत आली नाही तर मे.कोर्ट हक्काबद्दल पुरावा घेण्याची कारवाई करेल. आणि जर अर्जदार हे कै.सरोज राजेश दिक्षित यांचे वारस आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०४/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.नियंका स्पेसयार्डस ॲण्ड लिजींग प्रायव्हेट लिमिटेड तर्फे डायरेक्टर श्री.सुधीर देवीदास गव्हाळ पत्ता : आयकॉनो टॉवर, भूखंड क्र.४१/१२, सेक्टर-३०, वाशी, नवी मुंबई यांनी मुळ मालक १) श्रीमती.शांताबाई उर्फ मालती माणिक घरत, रा.घर नं.१४०-२, धानसर, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड २) श्रीमती.लिलाबाई तुकाराम टेकालकर, रा.घर नं.१९ बी, मु.पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड ३) श्री.सुरेंद्र तुकाराम चौधरी, रा.घर क्र.६८२७/१५५ सी, मढ इसलेंड, मालाड (प), मुंबई-४०००६१ ४) श्री.विरेंद्र तुकाराम चौधरी, ५) श्री.नितेंद्र तुकाराम चौधरी, ६) श्री.धर्मेंद्र तुकाराम चौधरी, रा.चौधरी हाऊस, मढ, मार्वे रोड, मार्केट रोड, वाया वर्सोवा, मढ इसलेंड, मालाड (प), मुंबई-४०००६१ ७) श्रीमती.अलका अशोक रावते, रा.घर नं.६/२२, मुकूंद सोसायटी, गवाणपाडा, मुलुंड (पु.), मुंबई-४०००८१, ८) श्रीमती.दमयंती दिनेश कांबळे उर्फ कांबळी, घर नं.बी-११/१०, बेस्ट राजदूत सोसायटी, घाटकोपर (पु), मुंबई-४०००७५ यांच्याकडून त्यांच्या मालकीच्या जमिनीच्या संपादनापोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे खालील भूखंड मिळालेला असून सदरहू भूखंड आमचे अशिल यांनी भूखंड खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**पुष्पकनगर-दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**
**सिडको संचिका क्र.**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर-दापोली | ७ | ४२ बी | ८३० चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची काणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसांत जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे.
दि.०६/१०/२०२२
सही/-
**ॲड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, से.१ ए, प्रभात सेंटर सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

# संक्षिप्त...

## रोख रकमेसह दागिन्यांची बॅग लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल बस स्टॅन्ड येथून रोख रकमेसहसोन्याच्या दागिन्यांची बॅग लंपास झाल्याची घटना घडली आहे.

मनसुख पिरखाँ पठाण यांच्याकडे असलेल्या बॅगेमध्ये रोख रकमेसह सोन्याचे दागिने असा मिळून ६१ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज ठेवला होता ते पनवेल बस स्टॅन्ड येथे आले.

त्यानंतर त्यांनी त्यांच्या पत्नीजवळ सदर बॅग ठेवून जवळील रिक्षा स्टॅन्ड येथे रिक्षा आणण्यासाठी गेले असता त्यादरम्यानच्या काळात अज्ञात चोरट्याने सदर बॅग चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत कळंबोली पोलीस ठाणे आयोजित रक्तदान शिबिराचे आयोजन आठ व नऊ डिसेंबर रोजी नवीन सुधागड एज्युकेशन सोसायटी, सेक्टर एक, कळंबोली येथे करण्यात आले आहे.

हे शिबिर सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे. या शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे व रक्तदान करावे असा आवाहन कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी केले आहे.

## कानपोलीत राहणारी विवाहित बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कानपोली गावात राहणारी विवाहिता कोणास काही एक न सांगता घरातुन निघुन गेल्याने या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे.

दिपीका महेंद्र पालकर (वय २३ वर्षे) असे या महिलेचे नाव असून सदर महिलेची उंची ४.९ इंच, चेहरा गोल, नाक सरळ केस काळे व लांब, रंग गोरा, बांधा मजबुत, अंगात नेसुन गुलाबी रंगाचा टॉप, उजव्या हातावर च-कएछ असे गोंदलेले, गळयात साधे मंगळसुत्र, पायात चप्पल असून तीला मराठी भाषा बोलता येते.

तरी या महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२४४४ किंवा पोना नितीन डगळे यांच्याशी संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# पनवेल येथील महिलेचे शेकाप पुरस्कृत गरबा दांडिया २०२२ महोत्सवात बाजी

## प्रथम क्रमांक म्हणून श्रुती शिर्के हिला मिळाली स्कूटी दुचाकी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

करंजाडे येथील सेक्टर येथील मैदानावर आयोजित केलेला शेकाप पुरस्कृत गरबा दांडिया २०२२ ची सांगतात दसऱ्याला करण्यात आली. गेल्या नऊ दिवस उत्साहामध्ये गरबा साजरा करण्यात आला. महिलांनी दांडीया खेळण्याचा आनंद घेतला. यामध्ये पनवेल येथील श्रुती शिर्के हि पहिल्यता मानाची मानकरी ठरली. यावेळी उपस्तित असलेले माजी विरोधीपक्षनेते प्रीतम म्हात्रे, ममता प्रीतम म्हात्रे, तसेच सरपंच रामेश्वर आंग्रे, मंगेश बोरकर तसेच मित्रमंडळ यांच्या उपस्तित शिर्के हिला स्कूटी दुचाकी देण्यात आली.

गरबा आणि दांडिया प्रेमी नवरात्र-ोत्सवाची अतुरतेने वाट पाहत असतात. नृत्याचा आनंद घेण्यासाठी तरूणाईसह महिलांना अधिक आवड आहे. दांडिया नृत्य करण्यासाठी मोठ्या जागेची गरज लागते. यावर्षी करंजाडे वसाहतीतील येथील सेक्टर चार साकार अकॅडमीचे हार्दिक गोखणी यांच्या मैदानावर शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत गरबा दांडिया रास २०२२ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार जयंत पाटील यांनी उपस्थित दर्शवित शुभेच्छा दिल्या. तसेच माजी विरोधीपक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनीही प्रस्त्यक्षात भेट देत करंजाडेकरांना नवरात्रोत्सव व दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. गेल्या नऊ दिवस दांडीया नृत्याची हौस पूर्ण करण्यासाठी तरूण - तरूणी मोठ्यासंख्येने उपस्तित होते. रोजच्या रोज सुमारे पाचशे ते एक हजार नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी करीत होते. तरूणाई दांडीया खेळण्याचा आनंद घेत होते. यावेळी एरणीच्या देवा तुला.... परी हू मैं या... झींगाट या संगीताच्या तालावर नवरात्रोत्सव गरबा रंगू लागला होता. पारंपारीक वेशभूषेत तरूणाई थिरकली. करंजाडे येथील शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक मंडळाच्या पधाधिकाऱ्यानी त्याचबरोबर स्वतः रामेश्वर आंग्रे व योगेंद्र कैकाडी यांनी या कार्यक्रमादरम्यान कोणताही अनुसुचित प्रकार घडु नये यासाठी महिलासाठी, मुलांसाठी तसेच लहान मुलासाठी असे वेगवेगळी दांडिया खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती. यावेळी गरबा व दांडीया खेळण्यासाठी तरूणाईकडून वेगवेगळ्या प्रकारचे पोषाक परिधान केला होता. यावेळी उत्कृष्ट वेशभूषा आणि दांडीया खेळणाऱ्या स्पर्धकांना पारितोषीक देऊन गौरविण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक श्रुती शिर्के, दुसरा क्रमांक प्रणय चौधरी, तसेच तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी म्हणून ऋषी कइनाकर ठरला. यावेळी माजी विरोधीपक्षनेते प्रीतम म्हात्रे, ममता म्हात्रे तसेच सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या हस्ते पारितोषीक देण्यात आली.

# नागोठणे शहर व विभागाच्या विकासासाठी नेहमीच कटीबध्द : आ. रविशेठ पाटील



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

प्रत्येक निवडणुकीत नागोठणेकरांनी व विभागाने मला व माझ्या परिवाराला मतदानाच्या रूपाने भरभरून प्रेम दिले आहे. मी आजपर्यंत नागोठणे शहरासह विभागाला निधीची कधीच कमतरता भासु दिलेली नाही. त्यामुळेच नागोठणे विभागाच्या विकासासाठी मी नेहमीच कटीबध्द असल्याची ग्वाही पेण-नागोठणे-सुधागड मतदार संघाचे कार्यक्षम आमदार रविशेठ पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिली. तसेच आता तर आपले सरकार आले आहे त्यामुळे नागोठणे विभागाचा विकासकामांच्या माध्यमातून कायापालट करणार असा आत्मविश्वासही यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला.

आमदार रविशेठ पाटील यांच्या आमदार निधीतून नागोठणे एस.टी.स्थानकालगत असलेल्या मिनीडोअर चालक मालक कल्याणकारी संस्था नागोठणे यांच्या मिनिडोर स्टँडचे शेड व कार्यालयाच्या रु. ७ लाख, ९१ हजार अंदाजपत्रकीय कामाच्या मंजुरीचे पत्र आमदार रविशेठ पाटील यांनी मिनीडोअर संघटनेचे अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे व पदाधिका-यांकडे नुकतेच सुपूर्द केले त्यावेळी कार्यकर्त्यांशी विकासकामांविषयी संवाद साधताना आमदार रविशेठ पाटील बोलत होते. यावेळी भाजपाचे रायगड जिल्हा माजी उपाध्यक्ष आणि नागोठण्यातील मिनीडोअर चालक मालक कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष किशोरभाई म्हात्रे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मारुती देवरे, जेष्ठ कार्यकर्ते सुभाष पाटील, ऐनघरचे उपसरपंच भाई लाड, मिनीडोर संघटनेचे उपाध्यक्ष शेखर जाधव, सचिव दितेश भोय, खजिनदार जनार्दन कदम, सभासद राजा गुरव, संदिप बलकावडे, आदींसह भाजपा कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. आमदार रविशेठ पाटील पुढे म्हणाले की, भारताचे कार्यसम्राट पंतप्रधान ना. नरेंद्र मोदी यांनी केंद्र शासनाची हर घर जल मिशन योजना मंजूर केली आहे. त्यामुळे माझ्या पेण-नागोठणे-सुधागड विधानसभा मतदार संघातील एकही ग्रामपंचायत या योजने पासुन वंचित राहणार नाही असा विश्वासही यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला.

# मुरुड तालुक्यात भटक्या कुत्र्यांची दहशत

## वाहनचालक, पर्यटक व मॉर्निंग वॉकला जाणारे नागरिक हैराण

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यात अनेक ठिकाणी तसेच समुद्र किना-यावर गेल्या अनेक दिवसांपासून विशेष करून सकाळच्या वेळेत भटक्या कुत्र्यांची दहशत असून पर्यटक व नागरिकांची डोकेदुखी ठरत असून याकडे शासनाच्या संबंधित तसेच नगरपरिषदेच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत असून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून मुरुड तालुका तसेच समुद्र किनारी सकाळच्या वेळेत भटके कुत्रे टोळक्याने फिरताना दिसतात.त्यामुळे सकाळच्या वेळेत समुद्र किनारी फिरायला (मॉर्निंग वॉकला) जाणा-या नागरिकांची व पर्यटकांची डोकेदुखी ठरत आहे.यापुर्वी देखील मुरुड मध्ये श्वानदंशाच्या अनेक घटना घडल्या आहेत.

नुकत्याच नांदगाव मध्ये तीन जणांना तर मुरुड मध्ये देखील श्वानदंश झाल्याच्या घटना ताज्या असून समुद्रकिनारी भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली असून अजूनही वेळप्रसंगी कोणत्याही क्षणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.यासाठी संबंधितांकडून पाहाणी करण्यात येऊन शहानिशा करून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

# खांडस येथे वागूरची तस्करी करणाऱ्यांवर वनविभागाने केली यशस्वी कारवाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कर्जत वनपरिक्षेत्र अधिकारी यांना खांडस येथे दि. ५ ऑक्टोबर २०२२ रोजी काही शिकारी लोक जंगलात गेल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुषंगाने राऊंड स्टाफ मौजे-खांडस गावाच्या पुढे जंगलाच्या दिशेने गस्त करीत असताना त्यांना MH-02 CP-2667 या क्रमांकाची पांढऱ्या रंगाची ईको गाडी संशयित वाटल्याने या गाडीचा ३ ते ४ मीटर पाठलाग करून थांबविली. या गाडीत वागूर नग-४, वागूर उभे करण्यासाठी २८ बांबूच्या काठ्या व दोन ठासनीच्या बंदुका मिळाल्या.

चालक देवानंद विठ्ठल खांडवी, रा.वडाचीवाडी नांदगाव, ता.कर्जत, यांच्यासह आरोपी रविंद्र रावजी वारगुडे व विशाल धोंडू बांगारे दोघेही रा.पेठारवाडी, ता.कर्जत असे एकूण तीन आरोपींना गाडी व मुद्देमालासह ताब्यात घेतले. कर्जत (पूर्व) वनपरिक्षेत्र अधिकारी पुढील तपास करीत आहेत. वनपाल खांडस (अतिरिक्त कार्यभार) काळुराम दगडू लांघी, खांडस वनरक्षक प्रकाश वैजनाथ मुंढे, चाफेवाडी वनरक्षक माधव शंकर केंद्रे व जामरुग वनरक्षक विठ्ठल बळीराम खांदाजे हे या कारवाईत सहभागी झाले होते. या कारवाईकरिता अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे व पनवेल सहाय्यक वनसंरक्षक एस.एन. वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले. कर्जत तालुक्यात जेथे वनक्षेत्रात अवैधपणे कोणताही वनगुन्हा होत असल्याचे निदर्शनास आल्यास १९२६ या टोल फ्री क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन वनविभागाने नागरिकांना केले आहे.

# उत्तम कुंभार पाली सुधागडचे नवे तहसीलदार



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्याचे नवे तहसीलदार म्हणून उत्तम दिनकर कुंभार यांनी नुकताच पदभार स्वीकारला. उत्तम दिनकर कुंभार हे प्रशासनाचा दांडगा अनुभव असलेले तसेच अत्यंत शिस्तप्रिय अधिकारी असून यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुंबई बांद्रा येथे सेवेत कार्यरत होते, उल्हासनगर येथे तहसीलदार म्हणून प्रभावीपणे काम पाहिले आहे. पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागेवर कुंभार यांनी पाली तहसील कार्यालयाची सूत्रे हाती घेतली.

सुधागड तालुक्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आवश्यक ते योगदान देणार असल्याची ग्वाही तहसीलदार उत्तम कुंभार यांनी दिली. लोकशिक्षणाची चळवळ गतिमान करण्याबरोबर आदिवासी विकास प्रकल्प , कामगार आयुक्त यांच्या सहकार्याने आदिवासी स्थलांतर रोखण्यासाठी लक्ष देणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सुधागड तालुका आदिवासी बहुल तालुका असून कातकरी उथान अभियान तसेच , मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सप्तसूत्रीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणार आहोत. असे तहसीलदार कुंभार यांनी स्पष्ट केले.

दिलीप रायन्नावार यांनी पाली तहसीलदार म्हणून तीन वर्षाहून अधिक काळ अत्यंत प्रभावीपणे व जनसेवेचे व्रत अंगिकारून यशस्वीरीत्या कारभार सांभाळला.सुधागड तालुक्यातील शोषित वंचित ,दुर्बल दुर्लक्षित , गोरगरीब आदिवासी, कातकरी समाजासह प्रत्येक घटकांच्या सर्वांगीण शाश्वत विकासासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. लोककल्याणकारी योजना व सोयीसुविधा देण्यास कायम पुढाकार घेतला. आदिवासी स्थलांतर रोखण्यासाठी दिलीप रायन्नावार यांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. आता नव्याने रुजू झालेले तहसीलदार उत्तम कुंभार यांनी देखील प्रशासकीय कारभार हाती घेतला असून जास्तीत जास्त चांगली कामे या पदावरून केली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रशासकीय अनुभवाचा उपयोग करून महसूल विभाग अंतर्गत शासनाच्या विविध लोकाभिमुख व विधायक योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोहचवून प्रत्येक घटकाचा विकास साधण्यासाठी प्रयत्नशिल राहणार असल्याचे कुंभार म्हणाले. सुधागड तालुक्यात तहसीलदार म्हणून सकारात्मक भूमिकेतून काम करणार असून तालुक्यातील जनतेने जास्तीत जास्त सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार उत्तम कुंभार यांनी केले.

# माथेरानमध्ये धनगर समाजाचा दसरा मेळावा उत्साहात



**दै.रायगड नगरी । माथेरान**

दोन वर्षांच्या कोरोना काळात सर्व सण साजरे करता आले नाहीत त्यामुळे आता लॉक डाऊन नंतरच्या काळात सर्वजण आपापले सण, उत्सव मोठया आनंदाने साजरे करताना दिसत आहेत. दसरा या शुभप्रसंगी धनगर समाजाच्या वतीने दसरा मेळाव्याचे आयोजन नवोदित अध्यक्ष दीपेश ढेबे यांच्या नेतृत्वाखाली उत्तम प्रकारे करण्यात आले होते.

इंदिरा गांधी नगर येथील धनगर समाजाच्या समाजमंदिरात अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याला जेष्ठ सदस्य रामचंद्र ढेबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यानंतर महात्मा गांधी मार्गावरील अहिल्याबाई होळकर चौकातील अहिल्याबाई होळकर यांच्या नामफलकास कर्जत तालुका धनगर समाज अध्यक्ष तुकाराम आखाडे यांच्या हस्ते पुष्पहार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष दीपेश ढेबे, कार्याध्यक्ष राम ढेबे, उपाध्यक्ष लक्ष्मण शिंगाडे, सचिव सुशांत ढेबे, खजिनदार निलेश ढेबे, माजी अध्यक्ष राकेश कोकळे, प्रवीण बावदाने, मारुती कोकळे, जेष्ठ सदस्य रामचंद्र ढेबे, महिला वर्ग यांसह असंख्य समाज बांधव उपस्थित होते.

माथेरानचे ग्रामदैवत श्री पिसारनाथ महाराज मंदिरात सर्व समाज बांधवांनी एकोप्याने जाऊन मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या श्री सत्यनारायण महापूजेचा महाप्रसादाचा लाभ घेतला यावेळी त्याठिकाणी सर्वांनी मिळून गजानृत्य सादर केले. पिसरनाथ महाराज उत्सव कमिटीचे अध्यक्ष गणेश गोरे यांनी उत्तम नियोजन केले. एकूणच दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व धनगर समाज एकीने आणि आपुलकीने या महत्वपूर्ण कार्यक्रमात सहभागी झाले होते.

## दोन वाहनांच्या धडकेने मोटार सायकलस्वार जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनोळखी होंडा शाईन मोटारसायकल चालकाने समोरील बाजूने येणाऱ्या मोटारसायकलला धडक देऊन झालेल्या अपघातात सदर गाडीवरील मोटार सायकल स्वार जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील वाकडी गावाच्या हद्दीत स्वप्ननगरी समोरील रस्त्यावर घडली आहे.

संतोष मुंढे (वय २६) हे त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल घेऊन चिंचवली ते वाकडी असे जात असताना समोरून बाजूकडून आलेल्या अनोळखी होंडा शाईन वरील मोटार सायकलवरील चालकाने त्याच्या गाडीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात संतोष मुंढे हे जखमी झाले असून या अपघातानंतर सदर मोटार सायकलस्वार पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# चाईल्ड केअर संस्थेतर्फे विविध क्षेत्रातील महिलांना उरण विशेष सन्मान पुरस्कार प्रदान

**दै.रायगड नगरी । उरण**

नवरात्री उत्सवचे औचित्य साधून चाईल्ड केअर सामाजिक संस्था उरण, रायगड तर्फे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू यांच्या मार्गदर्शनाखाली उरण मधील नव दुर्गा (विविध क्षेत्रा-तील नऊ महिलांचे )उरण विशेष सम्मान २०२२ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सम्मानित केलेल्या नऊ दुर्गा खालील प्रमाणे:- सुमनताई संग्राम तोगरे (समाजसेविका ),कु. श्वेता यशवंत भोईर-विंधणे (पत्रकारिता ), दर्शना प्रफुल्ल माळी- बालई (निवेदका),डॉ. स्व-ाती सुयोग म्हात्रे- आवरे (आरोग्य सेवा), नीता विजय डाऊर- करंजा(महाराष्ट्र पोलीस ),कु. धनश्री गणेश बंडा- नवघर (गायिका ),वर्षा मनीष म्हात्रे- कुंभारवाडा (आदर्श शिक्षका ),कु. अनघा प्रदीप कडू-सोनारी (अभिनेत्री ),कु. अमेघा अरुण घरत-खोपटे (राष्ट्रीय कुस्ती पटू )या उरण तालुक्यातील महिलांचा शाल, श्रीफळ, समानचिन्ह, संस्थेचे प्रमाण पत्र, साडी, तुळशीचे रोपटे देऊन उरण विशेष सम्मान २०२२ या पुरस्काराने गौरवण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू, कुणाल पाटील (वाहतूक सेना उपाध्यक्ष उरण ),जाणता राजा प्रतिष्ठान चे अध्यक्ष विवेक पाटील, कौशिक रोडलाईन चे सुजित तांडेल, जितेंद्र पाटील (भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ), संदीप तांडेल (पागोटे ), प्रकाश तांडेल(गायक ), अरुण घरत (शिक्षक) तसेच श्री साई गणेश नवरात्र उत्सव मंडळाच्या महिला हर्षली तांडेल,अर्चना तांडेल,नंदिनी ठाकुर,रसिका तांडेल,भरती म्हात्रे,चंद्रभागा ठाकूर,हेमांगी ठाकूर,विक्रांती तांडेल,प्रगती ठाकूर,नंदिनी ठाकुर आदी महिला उपस्थित होत्या.कार्यक्रम खूप आनंदीमय वातावरणात पागोटे हुतात्मा स्मारक जवळ हुतात्मा रंगमंच पागोटे तेथे पार पडला. श्री साई गणेश नवरात्र मंडळ पागोटेचे सभासद प्रशांत तांडेल,रोशन ठाकूर,विशाल ठाकूर,जगदीश तांडेल, नरेंद्र तांडेल,देवेंद्र तांडेल,प्रभाकर म्हात्रे,नयन पाटील,वैभव पाटील,राकेश म्हात्रे, संदीप म्हात्रे यांनी या कार्क्रमाचे नियोजन केले होते. या कार्यक्रमाला सर्व पागोटे ग्रामस्थ उपस्थित होते. चाईल्ड केअर सामाजिक संस्थेचे मनोज ठाकूर (उपाध्यक्ष ),तुषार ठाकूर (उपाध्यक्ष ),हितिक पाटील (कार्याध्यक्ष),राजेश ठाकूर (सह सचिव ),उद्धव कोळी (सह खजिनदार ), विवेक कडू (सदस्य ),विनय पाटील (सदस्य ),विक्रांत कडू, आदित्य पारवे आदी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी विशेष मेहनत घेतली.कार्यक्रमाचे प्रस्तावना विकास कडू यांनी केली ते प्रस्तावनात म्हणाले कि आज वर आम्ही अनेक उपक्रम राबवले आदिवासी वाडी मध्ये अन्न धान्य वाटप, झोपडपट्टी मध्ये अन्नदान, अनाथ आश्रम मध्ये उपयोगी वस्तू वाटप, मतिमंद शाळे मध्ये बुद्धीला चालना मिलेल त्या वस्तू वाटप, रक्तदान शिबीर, वृक्षरोपण, समुद्र किनारी श्रम दान, विविध शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप, आंगण वाड्यामध्ये खाऊ वाटप केले.